# फटाके फोडीत आ. लंके यांचा आनंदोत्सव!




# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक १२८, रविवार २८ जानेवारी २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

## गंगथडीच्या नायकाचा संघर्षमय प्रवास



मनोज जरांगे यांच्या नेतृत्वात मोठ्या संख्येने मराठा आंदोलक नवी मुंबईत दाखल झाले होते. मराठा आरक्षण आंदोलनाचे ते चेहरा बनले आहेत. जालन्यातील आंतरवाली सराटीत ३१ ऑगस्टला कुणबी नोंदीसाठी आंदोलन करणाऱ्या आंदोलकांवर लाठीचार्ज झाला आणि मनोज जरांगे यांचं नाव मोठ्या पातळीवर प्रकाशझोतात आले. मनोज जरांगे यांनी सातत्याने विषय लावून धरत त्यांच्या मागण्या मान्य करुन घेतल्या आहेत. गेल्या पाच महिन्यात मनोज जरांगे यांची ओळख गंगथडीचा नायक ते मराठा योद्धा असा प्रवास झाला आहे.मनोज जरांगे पंधरा वर्षांपासून मराठा आरक्षण आणि शेतकरी प्रश्नांवरील छोटी मोठी आंदोलनं त्यांच्या शिवबा संघटनेच्या माध्यमातून करत होते. मराठा आरक्षण आंदोलन जालन्यातील आंतरवाली सराटीत होत असलं तरी मनोज जरांगे यांचं मूळ गाव बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील मातोरी हे आहेत. मनोज जरांगे यांना मानणारा मोठा वर्ग अंबड, घनसावंग आणि गेवराई तालुक्यात आहे. या भागातून गोदावरी नदी वाहते. यालाच गंगथडी म्हणतात. मनोज जरांगे गेल्या १५ वर्षांतील आंदोलनांमुळं गंगथडीचे नायक बनले होते. मराठा आरक्षण आंदोलन उभारणी करताना त्यांनी दोन महिने गंगथडीच्या आजूबाजूच्या १२३ गावांमध्ये सभा घेत शहागड येथे रास्ता रोको केला होता. ग्रामीण भागातील मराठा शेतकरी शेतमालाचे भाव कोलमडल्यानं किमान कुणबी नोंदींद्वारे जात प्रमाणपत्र मिळून आरक्षण मिळाल्यास शैक्षणिक शुल्क कमी होईल आणि नोकरीत आरक्षण मिळेल या आशेने मनोज जरांगे यांनी आंदोलन केलं होतं. त्यावेळी त्यांचं निवेदन सरकारतर्फे तीन मंत्र्यांनी स्वीकारावं अशी त्यांची मागणी केली होती. ती मान्य न झाल्यानं मनोज जरांगे उपोषणाला बसले पुढे ते आंदोलन चिघळलं आणि लाठीचार्जनंतर ते प्रसिद्धीच्या झोतात आले.मनोज जरांगे यांच्या आंदोलनानंतर राज्यभरातील महसूल खात्यातील कागदपत्रांमध्ये असलेल्या कुणबी नोंदींची तपासणी सुरु झाली. राज्य सरकारने न्या. शिंदे यांची समिती स्थापन केली. या समितीच्या मार्गदर्शनाखाली राज्यभरात कुणबी नोंदी शोधमोहीम राबवण्यात आली. यादरम्यान अनेकांच्या कुणबी नोंदी समोर आल्या. मात्र, राज्य सरकारनं मनोज जरांगे यांचे उपोषण सोडवताना सगेसोयऱ्यांना आरक्षण देण्याची विनंती मान्य केली होती. मात्र, त्याची अंमलबजावणी होत नव्हती. मात्र, अंतरवाली सराटी ते मुंबई असा मोर्चा त्यांनी काढला. अखेर नवी मुंबईत मनोज जरांगे आंदोलकांसह पोहोचले आणि राज्य सरकारने कुणबी नोंदींच्या आधारे सगेसोयऱ्यांना आरक्षण देण्याबाबतचे राजपत्र सरकारने प्रसिद्ध केले, अशा रितीने मनोज जरांगे यांचा गंगथडीचा नायक ते मराठायोद्धा पूर्ण झाला.मनोज जरांगे यांनी सप्टेंबर महिन्यापासून ते आतापर्यंत राज्य सरकारच्या प्रतिनिधींशी चर्चा करताना ती माध्यमांसमोर केली. दरम्यानच्या काळात ते आरक्षण घेतल्याशिवाय घरी देखील जाणार नाही म्हणाले होते. आता राज्य सरकारने सगेसोयरेची मागणी मान्य केल्याने जरांगे आता त्यांच्या घरी जातील.

# मराठा योद्धा जिंकला ! मनोज जरांगेंचे आंदोलन मागे

### ■ आरक्षणाबद्दल दिलेला शब्द पूर्ण केला : मुख्यमंत्री ■ राज्यभर मराठ्यांचा जल्लोष ■ आरक्षणाचे श्रेय मराठा समाजाचे : जरांगे पाटील





मुंबई : प्रतिनिधी

**मराठा आरक्षणाच्या मागणीबाबत सरकारला अल्टिमेटम देणारे मनोज जरांगे यांनी आंदोलन मागे घेतले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते घेत फळांचा रस घेत मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण सोडले आहे. तर मुख्यमंत्री शिंदेंच्या हस्ते त्यांनी पत्रही स्वीकारले आहे.**

मराठा आरक्षणाचे कार्यकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी महाराष्ट्र सरकारला त्यांच्या मागण्यांबाबत अधिसूचना काढण्यासाठी २४ तासांची मुदत दिली होती. त्याचवेळी आता मनोज जरांगे म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चांगले काम केले आहे. आमचा विरोध आता संपला आहे. त्यांनी आमची विनंती मान्य केली आहे.

याआधी काल मनोज जरांगे पाटील यांनी शनिवारी सकाळी ११ वाजेपर्यंत सरकारला अल्टिमेटम दिला होता. ते म्हणाले- ११ वाजेपर्यंत आरक्षणाचा अध्यादेश जारी करा, अन्यथा १२ वाजता मुंबईतील आझाद मैदानावर पोहोचून आंदोलन सुरू करू, पण रात्रीतून मोठ्या घडामोडी झाल्या आणि सरकारने सर्व मागण्या मान्य केल्याने मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलन मागे घेतल्याचे जाहीर केले आहे.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आपल्याला अपेक्षित सर्व गोष्टी सरकारने मान्य केल्या आहेत. आपण उद्या सर्व जण उर्वरीत पान ३ वर

### शेवटी मिळवले की नाही !

**मराठा समाजाच्या आरक्षण आंदोलनाचा मनोज जरांगे पाटील यांचा प्रदीर्घ लढा संपला. मराठा आरक्षणाच्या आंदोलनाला यश मिळाल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी वृत्तवाहिनीशी संवाद साधला आहे. यावेळी बोलताना ते म्हणाले की, मिळू देणार नाही. कसे मिळू देणार नाही. मिळवले की नाही. सगे सोयऱ्यांचा अध्यादेश निघाला की नाही, शेवटी मिळवले की नाही, दाखवले की नाही करुनअशा शब्दात मनोज जरांगे पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आणि विरोधकांना चोख उत्तर दिले आहे.**

### कधीपासून सुरु झाले आंदोलन

मनोज जरांगे पाटील यांनी २०११ पासून मराठा समाजासाठी काम करण्यास सुरुवात केली. आरक्षणाच्या चळवळीत ते २०११ मध्ये सक्रिय झाले. अवघ्या तीन वर्षांत ते आरक्षण आंदोलनाचे नेतृत्व करु लागले. त्यांनी २०१४ मध्ये छत्रपती संभाजीनगर येथे विभागीय आयुक्तालयावर मोर्चा काढला. हा मोर्चा लक्षवेधक ठरला. त्यानंतर २०१५ ते २०२५ या काळात त्यांनी ३० हून अधिक आंदोलने केली.

### समाजाच्या आरक्षणासाठी जमीन विकली

मनोज जरांगे पाटील बीड जिल्ह्यातील मोतोरी या गावातील रहिवाशी आहेत. त्यांनी बीडमधून जालनाकडे आपला मुक्कम हलवला. त्यांच्या घराची परिस्थिती सामान्य होती. यामुळे उपजिविकेसाठी त्यांनी हॉटेलमध्ये काम सुरु केले. परंतु समाजासाठी काम करायचे त्यांनी ठरवले आणि कुटुंबाकडे दुर्लक्ष करत मराठा आंदोलनात सहभागी झाले. मराठा आंदोलन उभारण्यासाठी त्यांनी स्वत:च्या जमीन विकली. मराठा समाजाच्या आरक्षणासाठी अनेक मोर्चे काढले. आमरण उपोषणे केली. रास्ता रोको आंदोलन केले. त्यामुळे मनोज जरांगे पाटील हे नाव संपूर्ण मराठवाड्यात पसरले.

### संपूर्ण मराठा समाजाचा विजय

हा विजय संपूर्ण मराठा समाजाचा आहे. सरकारने सगेसोयऱ्यांबाबत जीआर दिला. आमच्या विजयाचं श्रेय सर्व मराठा समाजाला. केसेस मागे घेण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश. मुंबईकडे आलो नसतो तर आरक्षण मिळालं नसते. मराठा समाजासाठी भविष्यातही लढा देत राहणार.आंतरवालीत बैठक घेऊन विजयी सभेची तारीख सांगणार. विजयी सभा लवकरच घेणार. मराठा समाजाचा हा ऐतिहासिक विजय आहे. असे जरांगे पाटील म्हणाले.मनोज जरांगेंना सुधारित अध्यादेश सुपूर्द करण्यात आला असून त्या अध्यादेशामध्ये सग्यासोयऱ्यांच्या मुद्द्याचा समावेश करण्यात आलेला आहे. यासोबत मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले की, सरकारने सगेसोयरेबाबतचा जीआर दिला आहे. मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्यात येणार आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी त्याबाबत आदेश दिले आहेत. तसेच वंशावळीसाठी तालुका स्तरावर समिती नेमली. आरक्षणावर अधिवेशनात कायदा येणार.

### कोणकोणत्या मागण्या मान्य झाल्यात?

- ■ नोंदी मिळालेल्या सर्व लोकांच्या परिवारास कुणबी प्रमाणपत्र मिळाले पाहिजे. अशी मागणी जरांगे यांनी केली होती. ती मान्य करण्यात आली आहे.
- ■ राज्यभरात ५४ लाख नाही तर ५७ लाख नोंदी मिळाल्या आहेत. तसेच आतापर्यंत ३७ लाख लोकांना प्रमाणपत्र दिले गेले आहे. याचा डेटा आम्हाला द्या, अशी मागणी जरांगेंनी केली होती. ही मागणी मान्य करण्यात आली.
- ■ शिंदे समिती रद्द करायची नाही, ही जरांगे यांची मागणी मान्य झाली. सरकारने दोन महिने मुदत वाढवली. तसेच समितीची मुदत आणखी टप्प्याने वाढवणार असल्याचे मान्य केले.
- ■ सगे सोयऱ्यांना प्रमाणपत्र मिळाले पाहिजे. त्याशिवाय सोयऱ्यांचा फायदा होणार नाही. अशी जरांगेंची मागणी होती, ती सरकारने मान्य केली.
- ■ ज्या महाराष्ट्राच्या मराठ्यांकडे कुणबीची नोंद नाही, त्या बांधवांनी शपथपत्र करुन द्यायचे आहे. त्या शपथपत्राच्या आधारावर त्याला प्रमाणपत्र द्यायचे आहे. हे शपथपत्र १०० रुपयांना आहे. परंतु ते मोफत देण्याचे मान्य केले.
- ■ अंतरवाली सराटीसह मराठा आंदोलकांवरील सर्व गुन्हे मागे घ्या, त्यासाठी गृहविभागाने पत्र द्यावे, अशी जरांगेंची मागणी होती. ती देखील मान्य करण्यात आली.
- ■ मराठा समाजाला आरक्षण मिळेपर्यंत सरकारी भरती करायची नाही. जर भरती केलीच, तर आमच्या जागा राखीव ठेवा, अशी मागणी जरांगेंनी यांनी केली. ती देखील मान्य करण्यात आली.
- ■ क्युरेटिव पिटीशनचा विषय सर्वोच्च न्यायालयात आहे. ते आरक्षण मिळेपर्यंत आणि मराठा समाजातील सर्वांना शंभर टक्के शिक्षण मोफत करण्यात यावे ही मागणी मान्य झाली.

## मराठा आरक्षणाचे पारनेर शहरात स्वागत

### फटाक्यांची आतिषबाजी आणि घोषणाही

पारनेर : किरण शिंदे

**मराठा आरक्षणासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अध्यादेश जारी करून संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या आरक्षणासंदर्भातल मागण्या मान्य केल्यानंतर पारनेर शहरात या निर्णयाचे फटाक्यांची आतिषबाजी आणि घोषणा देत स्वागत करण्यात आले.**



मराठा आरक्षणाचा अनेक वर्षांपासूनचा प्रलंबित प्रश्न मनोज जरांगे यांच्या खंबिर भूमिकेमुळे व सकल मराठा समाजाने जरांगे यांना एकमुखी पाठींबा दिल्याने उर्वरीत पान ३ वर

## फटाके फोडीत आ. नीलेश लंके यांचा आनंदोत्सव !

### टाकळी ढोकेश्वर येथे जल्लोष



■ मराठा आरक्षणासंदर्भात निर्णय झाल्यानंतर आ. नीलेश लंके यांनी टाकळी ढोकेश्वर येथे फटाके फोडून आनंदोत्सव साजरा केला.(छाया :सुदेश आबूज)

टाकळी ढोकेश्वर : सुदेश आबूज

**मराठा समाजाच्या आरक्षणासंदर्भात अध्यादेश पारीत करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा योध्दा मनोज जरांगे यांना फळांचा रस देऊन त्यांचे आंदोलन मागे घेण्यात आल्यानंतर आमदार नीलेश लंके यांनी टाकळी ढोकेश्वर येथे फटाके फोडत आनंदोत्सव साजरा केला.**

यावेळी बोलताना आ. लंके म्हणाले, मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी गेल्या काही महिन्यांपासून लढा उभारला होता. जीवाची पर्वा न करता त्यांनी वेळप्रसंगी अन्नत्याग केला. समाजाला आरक्षण मिळावे या प्रामाणिक भावनेतून जरांगे पाटील यांनी मोठे आंदोलन उभे केले. त्यांच्या या आंदोलनास ऐतिहासिक यश आले आहे. सरकारने मराठा समाजाच्या या मागणीची दखल घेऊन आरक्षणासंदर्भात सकारात्मक निर्णय घेतल्याबद्दल मी सरकारलाही धन्यवाद देतो. या निर्णयामुळे मराठा समाजाला खऱ्या अर्थाने न्याय मिळाला असून जरांगे पाटलांची लढाई यशस्वी झाली असल्याचे आ. लंके यांनी सांगितले.

मराठा समाजाच्या आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलन सुरू केल्यानंतर आ. नीलेश लंके यांनी विधीमंडळाच्या आवारात आंदोलन करीत सरकारचे लक्ष वेधले होते. याच प्रश्नासाठी त्यांनी मंत्रालयाच्या प्रवेशद्वारास टाळे ठोकत मराठा आरक्षणाची जोरदार मागणी केली होती. मंत्रालयाच्या प्रवेशद्वारास कुलूप लावल्याप्रकरणी आ. लंके यांना अटक करण्यातय येऊन त्यांच्यावर गुन्हाही दाखल करण्यात उर्वरीत पान ३ वर

## भाळवणीकरांना आनंदी आनंद गडे!

### आरक्षणासाठी उभारला होता लढा

भाळवणी : सुदेश आबूज

**मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी आरक्षणासाठी अंतरवाली सराटी येथे उपोषण सुरू केल्यानंतर त्यांना समर्थन देण्यासाठी तालुक्यात भाळवणी येथे उपोषण सुरू झाले होते.आज मराठा आरक्षण मंजूर झाल्यानंतर या उपोषणकर्त्यांसहित भाळवणीकरांनी आनंद व्यक्त केला आहे.**

मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाच्या आंदोलनास समर्थन देण्यासाठी ६ सप्टेंबर रोजी राष्ट्रवादीचे जिल्हा सरचिटणीस अशोक उर्फ बबलूशेठ रोहोकले,सुधाकर रोहोकले, अभिजीत रोहोकले यांनी भाळवणी बाजार तळावर उपोषण सुरू केले होते. आमदार नीलेश लंके यांनी मध्यस्थी केल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी



भ्रमणध्वनीवर झालेल्या चर्चे नंतर या उपोषणकर्त्यांनी आंदोलन मागे घेतले.यादरम्यान भाळवणी परिसरासह तालुका भरातून आंदोलनाला मोठा प्रतिसाद मिळाला.भाळवणी गावांमध्ये कॅन्डल मार्च तसेच नगर - कल्याण रस्त्यावर रस्ता रोको आंदोलन ही करण्यात आले होते

उर्वरीत पान ३ वर

## मराठा एकजुटीचा विजय असो !

### निघोज ग्रामस्थांच्या आनंदाला भरते



निघोज : संदीप इधाटे

**मराठा एकजुटीचा विजय असो, मनोज जरांगे जिंदाबाद अशा घोषणा देत निघोजमध्ये मराठा आरक्षणाच्या निर्णयाचे मोठया जल्लोषात स्वागत करण्यात आले. जरांगे पाटील यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी फळांचा रस देत आंदोलन मागे घेताच निघोजकारांच्या आनंदाला भरते आले होते.**

मराठा आरक्षणासंदर्भात अध्यादेश जारी करीत मराठा आरक्षणासंदर्भात मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या सर्व मागण्या मान्य करण्यात आल्याचे जाहिर करण्यात आल्यानंतर निघोज ग्रामस्थ, उर्वरीत पान ३ वर

## संपादकीय

# अवघे वातावरण राममय


देशाच्या आर्थिक राजधानीतील नेहमीची दिवाळी फिकी वाटेल, इतकी रोषणाई सगळीकडे दिसते आहे. अवघे वातावरण राममय झाले आहे.मुंबई महानगरात कुठेही जा, अयोध्येत आल्यासारखे वाटेलअशी स्थिती आहे. प्रभू रामांची प्रतिमा असलेले भगवे झेंडे सर्वत्र लहरताहेत, अन् आता म्हणे बाजारात उपलब्धही नाहीयेत. दुकान असो का मकान, सर्वत्र प्रभू रामाचे दर्शन घडते आहे. ज्या भागात हिंदूंची वस्ती तुरळक आहे, अशा वस्त्यांमध्येही पताका, ध्वज लहरताहेत. एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे.पाचशे वर्षांनी श्रीराम स्वगृही परतत असल्याची भावना बहुसंख्याक समाजाच्या उन्मादात परिवर्तित झालेली नाही, हे सुदैव. तसे होऊही नये ही प्रभूचरणी प्रार्थना. आज मात्र नेहमीची दिवाळी फिकी वाटेल, इतकी रोषणाई सगळीकडे दिसते आहे. धर्म हाच भारताचा मुख्य भाव आहे हे स्वामी विवेकानंदांचे वाक्य खरे असल्याचा प्रत्यय सर्वत्र येतो आहे. अवघे वातावरण राममय झाले आहे.मंदिरामंदिरांत तर प्राणप्रतिष्ठा सोहळा दाखवला जाणार आहेच; पण गल्ली-वस्त्यांत एलईडी स्क्रीन उभारल्या आहेत. दिवसागणिक १० हजार रुपये आकारून ज्या एलईडी स्क्रीन मिळत, त्यांचा दर चार-पाच दिवसांपूर्वी २५ हजारांवर पोहोचला. आता एकही पडदा मिळत नाही, अशी स्थिती आहे.अयोध्येत जे आठ हजार निमंत्रित बोलावले गेले आहेत, त्यातली सर्वाधिक संख्या मुंबईतील आहे. अमिताभ बच्चन, सचिन तेंडुलकर, विराट कोहली हे अंबानी परिवाराच्या खासगी विमानातून अयोध्येला पोहोचणार आहेत, असे म्हणतात. देशातल्या मुख्यमंत्र्यांना प्राणप्रतिष्ठा समारंभाचे निमंत्रण नाही. पण एकनाथ शिंदे यांना पक्षप्रमुख या नात्याने बोलावण्यात आले आहे.त्या गर्दीतला एक बिंदू होण्याऐवजी शिंदे मुंबई- ठाण्यातल्या वातावरणनिर्मितीवर स्वार होणे पसंत करत आहेत. देवेंद्र फडणवीस नागपुरात ३३ वर्षांपूर्वी केलेल्या कारसेवेची संस्मरणे करताहेत. उद्धव ठाकरे यांना निमंत्रण पाठवले होते, हे संघपरिवाराने सांगून टाकले आहे.राममंदिर हे संघविचार मानणाऱ्या परिवाराच्या संघटनशक्तीचे प्रतीक आहे. त्याचे मार्केटिंग केल्याचा ठपका पुरोगामी भलेही ठेवोत; परिवाराने अत्यंत रेखीव आयोजन केले असे दिसते आहे. केवळ प्रतिष्ठितांनाच निमंत्रणे नाहीत तर मसणजोगी, फासेपारधी, वडार, मरिआई अशा समाजातले रामसेवक अयोध्येत निमंत्रितांमध्ये आहेत. विठ्ठल कांबळे, महादेव गायकवाड या दोघांची कुटुंबे पूजेचे मानकरी आहेत. ते ना शेटजी, ना भटजी.वर्षानुवर्षे संघपरिवाराशी संबंधित संस्थेमार्फत राष्ट्रकार्य करणारे कार्यकर्ते एवढीच त्यांची ओळख. या निमंत्रणांतून सामाजिक अभियांत्रिकी केली जाते आहे. मुंबईकर हे जाणताहेत. महाराष्ट्रात संघविचार परिवाराने गेल्या १५ दिवसांत ७० हजार कार्यकर्त्यांच्या मदतीने ७७ हजार घरी प्राणप्रतिष्ठेच्या अक्षता पोहोचवल्या. राममंदिर हे राष्ट्रमंदिर आहे हे सांगितले जात आहे. त्याला उत्साही प्रतिसादही मिळत आहे.देशभरातल्या मंदिरांत व्रतस्थ मोदी गेल्या पंधरा दिवसांत निष्ठेने पोहोचले. त्यांच्या या 'टेम्पल-रन'ला प्रारंभ झाला तो नाशिकच्या काळाराम मंदिरातून. तेथील गल्लीबोळांत जाऊ नका, असा सुरक्षा यंत्रणांचा निरोप होता; पण ते गेले. 'येथून निवडणूक लढवा' ची मागणीही हळूच सुरू झाली. त्यांना मिळणारा प्रतिसाद पाहून बाकी राजकारणी गोंधळले असावेत. प्रकाश आंबेडकरांनी ठामपणे सांगितले की, विभाजनाच्या या प्रयत्नात सहभागी व्हायचे नाही. मी जाणार नाही. बाकी नेते नंतर जाऊ, बांधकाम पूर्ण झाल्यावर जाऊ, असे सांगताहेत.भाजपने ठिकठिकाणी लावलेले फलक पाहून आता उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेच्या शाखाही सजू लागल्या आहेत. वाघाने मंदिर उभारले, असे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची छायाचित्रे लावून सांगणे सुरू आहे. मुंबईने राममंदिराचे आंदोलन वेगळ्याच पद्धतीने अनुभवले होते. नाक्यानाक्यावर शेकडो लोक महाआरतीसाठी एक येत.मशीद किंवा ढाचा पडला त्यानंतर मुंबई बॉम्बस्फोटाने हादरली. त्या काळी धर्माच्या आधारावर विभागलेल्या मुंबईला शिवसेना आधार वाटे. बाळासाहेब केवळ मराठी माणसाचे नाहीतर हिंदूंचे तारणहार झाले. आता नव्या पिढयांनाही तसेच वाटते का? मंदिराचा आनंद शिवसेनाही व्यक्त करु लागली तर सर्वोच्च न्यायालयाने हिंसक कृत्य ठरवलेल्या बाबरी पतनाचे श्रेय घेणाऱ्या शिवसेनेसमवेत बसणे महाविकास आघाडीतील अन्य पक्षांना मान्य होणार का?मुस्लिमांचा जो विश्वास उद्धव ठाकरे यांनी मिळवला आहे, तो टिकणार का कापरासारखा उडणार, याचीही परीक्षा होईल. धर्म आणि राजकारण वेगळे मानत निकाल वेगळे लागतील का? की सगळे नियोजनाप्रमाणे घडेल अन् भाजपला पाठोपाठ येणाऱ्या लोकसभेत चळवळीचे रामबळ अन जनतेचे पाठबळ मिळेल? राज्यभर संदेश जावा यासाठी अख्ख्या मंत्रिमंडळासह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यथावकाश अयोध्येत जाणार आहेत.हिंदुत्वाचा नारा बुलंद होईल हे काँग्रेसला लक्षात आले नाही, की उत्तर सुचले नाही, हा प्रश्नही सध्या चर्चेत आहे. रामनामाने विटा पण तरल्या म्हणतात. इथे तर तीन राजकीय पक्ष समवेत आहेत. या वातावरणाचा राजकीय फायदा घेण्याचा पुरेपूर प्रयत्न होईल. या संधीचे शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना काय करते, हे लवकरच कळेल. घोडामैदान जवळच आहे. काँग्रेसनेही मेळावे सुरू केले आहेत. बघू या काय होते ते !समूहाचा आविष्कार हा सध्याच्या सामाजिक वास्तवाचा स्थायीभाव झालेला दिसतोय. गर्दी होतेय. कधी मंदिरासाठी तर कधी आरक्षणाच्या मागणीसाठी. मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी मनोज जरांगे मुंबईकडे निघाले आहेत. समाजाला आरक्षण देऊ, असे सरकारने आश्वासन दिलेय; पण जरांगे यांचा त्यावर विश्वास नाही. शिंदे सरकारने मागासपणाचे सर्वेक्षण करायचे ठरवले आहे. यंत्रणा कामाला लागली आहे. तीन शिफ्टमध्ये सर्वेक्षण होणार आहे.विशेष अधिवेशन बोलावले जाणार आहे. तोवर मजल दरमजल करत जरांगे मुंबईत पोहोचलेले असतील. या काळात कुठेही सामाजिक तणाव निर्माण होऊ नये, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मागण्यांवर ठाम असलेल्या जरांगेंचे समाधान होते काय? त्यांच्या या लाँगमार्चला कसा प्रतिसाद मिळतो, यावर जनतेचे लक्ष आहे.

# पौषातील चैत्रपालवी !



प्रजासत्ताक दिनास केवळ तीन दिवस असताना अवघ्या भारतवर्षाने सोमवारी 'रामसत्ताक दिन' उदंड उत्साहात साजरा केला. खरे तर पौष शुद्ध द्वादशीच्या या शुभदिनी आपला देश रामनवमी, दीपावली आणि प्रजासत्ताक दिन असे तीन सण एकाच वेळी साजरे करण्यात दंग झाला होता. निमित्त होते अर्थातच अयोध्येत होत असलेल्या रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठेचे. केवळ भारतातीलच नव्हे तर जगभरातील जनता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पार पडलेल्या या 'प्राणप्रतिष्ठा सोहळ्या'चे दर्शन टीव्हीच्या शेकडो चॅनेल्सवरून घेताना भारावून गेली होती. या उत्साहित जनतेचे चेहरेच त्यामुळे शेकडो वर्षांपासूनचे आपले स्वप्न पूर्ण झाल्याचे सांगत होते. लोकसभा निवडणुकांना अवघे तीन-चार महिने बाकी असताना, हा मंदिर सोहळा विधिवत पार पाडण्यात यशस्वी झालेल्या भारतीय जनता पक्षासाठी तर ही निवडणूक प्रचाराची नांदीच होती! आता हे मंदिर यथावकाश पूर्णांशाने उभे राहील आणि याच सोहळ्याची गुंज भाजप तसेच मोदी यांनी प्रतिष्ठेच्या केलेल्या या निवडणूक प्रचारात अखेरपर्यंत वाजत राहील, हे सांगण्यास कोणत्याही होरारत्नाची गरज नाही.जम्मू-काश्मीरला स्वायत्तता देणारे राज्यघटनेतील कलम ३७० रद्दबातल करण्यात मोदी सरकार यापूर्वीच यशस्वी झाले आहे आणि आता 'रामलल्ला हम आएँगे; मंदिर वहीं बनाएँगे!' ही भाजपने १९८०च्या दशकात दिलेली घोषणाही पूर्णत्वास जात आहे. आता जनसंघाच्या स्थापनेपासूनच जाहीर केलेल्या कार्यक्रमातील 'समान नागरी कायदा' एवढ्याच एका आश्वासनाची पूर्ती होणे बाकी आहे. मात्र, सोमवारच्या सोहळ्यास मिळालेल्या या अभूतपूर्व प्रतिसादामुळे हे आश्वासनही भविष्यात पूर्ण होणार, याची साक्षच मिळाली आहे.'प्राणप्रतिष्ठा सोहळ्या'च्या या दिमाखदार 'इव्हेंट'मधील मुख्य आकर्षण हे अर्थातच पंतप्रधान मोदी यांचे भाषण होते आणि त्यांनीही भाषणात नेहमीच्या राजकीय शैलीला दूर सारून जनतेला गाढा विश्वास देण्याचेच काम केले. 'राम ही ऊर्जा आहे आणि राम हे शांततेचे प्रतीक आहे...राम केवल वर्तमान नहीं, राम भविष्य नहीं, राम अनंतकाल है...' असे सांगतानाच, त्यांनी हा दिवस विजयोत्सवाचा नव्हे तर आपण नम्रतेने वागण्याची शिकवण देणारा आहे, हा मुद्दाही अधोरेखित केला. त्यांच्या ३५ मिनिटांच्या भाषणातील हे सारेच मुद्दे भाजप कार्यकर्त्यांना एक नवा धडा देणारे होते. त्यास राममंदिरासाठी लालकृष्ण अडवानी यांनी १९९० मध्ये 'सोमनाथ से अयोध्या' या मार्गावरून काढलेल्या 'रथयात्रे'ची आणि त्यानंतर झालेल्या हिंसक दंगलींची पार्श्वभूमी होती. या 'रामजन्मभूमी आंदोलना'त बळी गेलेल्या अनेक करसेवकांची आठवण मोदी यांच्याबरोबरच उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत या सर्वांनीच जागवली. डॉ. भागवत यांनी गेल्याच आठवड्यात एका भाषणात समाजात विद्वेषाची भावना वाढत असल्याबद्दल खेद व्यक्त केला होता. हा विद्वेष जागविणाऱ्या आणि विखारी उन्माद दाखवणाऱ्या सर्वांचीच ही मोदी तसेच डॉ. भागवत यांनी एका अर्थाने घेतलेली ही शिकवणीच होती, हे सर्वांनीच लक्षात घ्यायला लागेल.या सर्व कटू इतिहासावर मात करून मोदी यांनी देशातील एका मोठ्या जनसमूहाचे हे स्वप्न साकार करून दाखविले, याबद्दल त्यांचे अभिनंदनच करायला हवे. मात्र, खुद्द मोदी यांनीच सांगितल्याप्रमाणे आता रामशक्तीपासून मिळणाऱ्या ऊर्जेतून नवभारत निर्माणाचा विचार व्हायला हवा. 'अब भारत का भविष्य अतीत से भी सुंदर होगा!' अशी ग्वाही पंतप्रधानांनी दिलीच आहे. त्यामुळे आता मंदिराच्या पलीकडे जाऊन, आपणा सर्वांनाच या भविष्याचा विचार करावा लागणार आहे. एकीकडे विज्ञान ज्ञान आणि माहितीची नवनवी कवाडे उघडत आहे. त्यावर श्रद्धा ठेवतानाच, अंधश्रद्धांना मूठमाती द्यावी लागणार आहे.सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे रामनामाचा गजर ज्या ऊर्जेतून देशभर झाला, तीच ऊर्जा आता देशहिताच्या विधायक कामांच्या दिशेने वळविण्याची जबाबदारी पंतप्रधान या नात्याने मोदी यांच्यावर आली आहे. राममंदिराच्या उभारणीमुळे एक स्वप्न साकार झाले आहे आणि त्याचबरोबर भाजपलाही तोंडावर आलेल्या लोकसभा निवडणुकीतील विजयासाठी एक नवा विषय हाती आला आहे. मात्र, मोदी यांच्या या अ-राजकीय भाषणामुळे 'अयोध्येतील राममंदिर' हा विषय राजकारणापलीकडला आहे, हेही स्पष्ट झाले आहे. सर्वपक्षीय राजकारण्यांनीही हे लक्षात घ्यायला हवे; कारण 'राम हा देशाचा आत्मा आहे!' असे मोदी यांनीच सांगून टाकले आहे. राजकारण हे विकासाच्या मुद्यावर व्हायला हवे, जात-धर्माच्या नव्हे; हे सर्वपक्षीय राजकारणी लक्षात घेतील तरच यानिमित्ताने पंतप्रधानांनी देशवासीयांना दाखवलेले नवनिर्माणाचे स्वप्न प्रत्यक्षात या भूमीवर अवतरेल, याबाबत आता संदेह उरलेला नाही.रामशक्तीपासून मिळणाऱ्या ऊर्जेतून नवभारत निर्माणाचा विचार व्हायला हवा. आता मंदिराच्या पलीकडे जाऊन, आपणा सर्वांनाच या भविष्याचा विचार करावा लागणार आहे.

# घराघरांवर रत्नतोरणे!




''जरा धीरे धीरे हांको, मेरे राम गाडीवालेजरा हौले हौले हांको, मेरे राम गाडीवाले'' प्रत्यक्ष मर्यादा पुरुषोत्तमाला गाडीवानाची उपमा देणाऱ्या संत कबीरांना जो श्रीराम अभिप्रेत होता, तोच आज देशातील कोट्यवधी रामभक्तांच्या मनीं विसावला आहे.कबीराचा गाडीवान राम जीवनाची गाडी हाकणारा. आपली सामान्य जीविते योग्य दिशेने मार्गस्थ करणारा. 'है जी गाडी अटकी रेत में, मेरी मजल पडी है दूर, धर्मी धर्मी पार उतर गया, पापी चकनाचूर' अशी ही या गाडीवानदादाची गाडी.संकटांच्या खाचखळग्यातून, अपप्रवृत्तींच्या वाटमारीमधून मुसाफिराला अलगद बाहेर नेणारी. त्याच्याच भरवश्यावर तर हा प्रवास चालला आहे, याची जाणीव करुन देणाऱ्या संत कबीरांना जो राम दिसला होता, तोच रामराणा आज धनुष्यबाणासहित अयोध्येतील मंदिरात स्थानापन्न होईल. श्रीराम हे आपल्या बहुसंख्यांचे दैवत.किंबहुना मनुष्यप्राणी कसा असावा, याचा तो मूर्तिमंत आदर्शच. अयोध्येचा हा राजा, देव असला तरी, नियतीचे फासे त्यालाही चुकले नव्हते. जीवनातले अकटोविकट संघर्ष पार करत, दुष्टप्रवृत्तींना आपल्या रामबाणाने विद्ध करत श्रीरामांनी आपले 'रामपण' सिद्ध केले.त्या रामतत्त्वाचे शाश्वत मंदिर अयोध्येत उभे राहिले आहे. एकवचनी, एकबाणी, मातापित्यांच्या आज्ञा विनाविवाद स्वीकारणारा, सत्य सिद्ध व्हावे म्हणून अवघड परीक्षेला धीरोदात्तपणे सामोरा जाणारा श्रीराम हे आपल्यासाठी एक जीवनमूल्य आहे.त्या जीवनमूल्याची प्रतिष्ठापना आज अयोध्येतील दिव्यसुंदर मंदिरात होत आहे. हा सोहळा अनेकार्थांनी भारतीयांसाठी ऐतिहासिक महत्त्वाचा आहे. त्याला सांस्कृतिकतेचे रंग आहेत. हजारो वर्षांच्या परंपरेचा प्रवाह त्यामागे वाहात आला आहे.काही भलेबुरे सामाजिक संदर्भ आहेत, आणि अपरिहार्यपणे मिळालेली राजकारणाची डूबदेखील आहे. या सर्वांच्यावर हा विश्वाचा विश्राम राम दशांगुळे वर उभा आहे. म्हणूनच त्याच्या सोहळ्यात सारा देश एकसमयावच्छेदेकरोन रममाण झालेला दिसतो.स्वत:च्याच जन्मभूमीत अनिकेत ठरलेल्या श्रीरामलल्लांच्या प्रतिष्ठापनेचा हा दिवस अखेर उजाडला, हाच मुळी एक दुर्मिळ योग आहे. भांडणतंटे, आंदोलने, हिंसाचार, कोर्टकज्जे, राजकीय डावपेच या साऱ्यांमधून तावून सुलाखून निघालेली ती सुंदर मूरत आज त्या भव्य मंदिरात प्रतिष्ठापित होईल, तेव्हा कोट्यवधी भाविकांना 'याजसाठी केला होता अट्टहास' ही जाणीव भावविभोर करेल.नळेचंद्रजोतींच्या रोषणाईने साऱ्या देशाचे नभांगण उजळून निघाले आहे. जणू सारा देशच शरयू नदीचा किनारा झाला आहे. आपल्या महाराष्ट्रात पंढरीच्या वारीच्यावेळी असेच इंद्रायणीचे वाळवंट विष्णुदासांच्या मांदियाळीने फुलून जाते. तसेच हे!पंढरीराण्याच्या दर्शनहेळामात्रे हेलावून जाणाऱ्या वारकऱ्यांच्या भक्तिभावाला कुणी तर्कशास्त्राचे नियम लावत बसत नाहीत. ही भक्तिची पेठ व्यवहारापलिकडची असते. श्रीरामांच्या भक्तीने देशातील बहुसंख्यांचा आनंद ओसंडून वाहात असेल, तर त्यात आपणही आपले थोडके स्मित मिसळावे.एखादी अस्फुट टाळी आपलीही वाजावी. देशभरातील कोट्यवधी भाविक आज आपापल्या घरांचे उंबरे दिव्यांनी उजळून टाकतील. घरोघरी गोडधोड होईल. ज्या घरात अजूनही दारिद्र्याचा काळोख आहे, तिथे गोडाधोडाचा प्रसाद नेऊन देण्याची खटपट होईल. मंगलकार्य यालाच म्हणायचे असते. एकमेकांच्या मंगलाची भावना जिथे जागृत होते, तो क्षण वाया का दवडायचा?एकाच वर्षात यंदा दोनदा दिवाळीचा सण आल्यागत वातावरण साऱ्या देशात निर्माण झाले आहे. 'घराघरावर रत्नतोरणे, अवतीभवती रम्य उपवने, त्यात रंगती नृत्यगायनें, मृदुंगवीणा नित्य नादति, अलकानगरीपरी' या 'गदिमां'च्या गीतरामायणातील पंक्तीं चक्क प्रत्यक्षात भूमीवर अवतरल्या आहेत.कालपरवापर्यंत जिथे तणावग्रस्त वातावरण होते, पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त होता, तिथे आता यापुढे रामभक्तांच्या आणि पर्यटकांच्या रांगा लागणार आहेत. जिथे रामलल्लांचे दर्शन अवघड बनले होते, तिथे स्थापत्य आणि शिल्पकलेचा आधुनिक नमुना ठरणारे भव्य मंदिर उभे राहिले आहे.ऐन कलियुगात त्रेतायुगाच्या निळ्यासावळ्या सावल्या पडल्या आहेत. या सोहळ्याची राजकीय किंवा सामाजिक मीमांसा पुढील काळात होत राहील. तशी ती व्हायलाच हवी. तूर्त तरी या गाडीवानदादाच्या गाडीत बसून आसपासची दिव्यशोभा पाहून मनोमन हात जोडावेत, हे खरे. सदिच्छांमध्येच खरा राम वसत असतो, आणि तो तर अंतर्यामी आहे.

राम नाम अवलंब बिनु, परमारथ की आस।
वरषत वरिद-बूँद गहि, चाहत चढ़न अकास।।

# शाश्वत शेतीसाठी जीवाणू



नुकतेच विश्वभारती विद्यापीठातील सूक्ष्मजीवशास्त्रज्ञांनी जीवाणूची नवीन जात शोधली. या विषयीचे संशोधन 'इंडियन जर्नल ऑफ मायक्रोबायोलॉजी' या कालिकात प्रसिद्ध झाले.

वनस्पती जमिनीतून पाणी आणि क्षार शोषतात. सूर्यप्रकाशाची ऊर्जा वापरून हवेतील कार्बन डायऑक्साइडचे रूपांतर स्वतःच्या अन्नात करतात. इतर मूलद्रव्ये जसे की, नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅशियम, कॅल्शियम, मॅग्नेशियम यांचीही त्यांच्या वाढीसाठी आवश्यकता असते. या मूलद्रव्यांचे क्षार पाण्यात विरघळलेल्या स्वरूपात असतील, तरच ते वनस्पतींना शोषून घेता येतात. जमिनीतील फॉस्फेट लोह किंवा अॅल्युमिनियम या मूलद्रव्यांबरोबर संयोग पावते आणि ते पाण्यात अविद्राव्य होते. असे अविद्राव्य क्षार वनस्पती मूळाद्वारे शोषून घेऊ शकत नाहीत. जमिनीतील काही जीवाणू फॉस्फेट आणि पोटॅशियमच्या अविद्राव्य संयुगांना विद्राव्य करतात. त्यामुळे या जीवाणूंकडून फॉस्फेट आणि पोटॅशियम क्षारांचा वनस्पतींना पुरवठा होतो. त्यामुळे वनस्पतींची वाढ जोमाने होते. या जीवाणूंना वनस्पती वर्धक जीवाणू म्हणतात.नुकतेच विश्वभारती विद्यापीठातील सूक्ष्मजीवशास्त्रज्ञांनी जीवाणूची नवीन जात शोधली. या विषयीचे संशोधन 'इंडियन जर्नल ऑफ मायक्रोबायोलॉजी' या कालिकात प्रसिद्ध झाले. झारखंडमधील झारिया गावच्या मातीत त्यांना हा जीवाणू मिळाला. तो एकाच वेळी मातीमधील पोटॅशियम आणि फॉस्फेट यांचे क्षार विद्राव्य स्वरूपात वनस्पतींना पुरवतो. शिवाय, हवेतील नायट्रोजनचे स्थिरीकरण करतो. या जीवाणूंचा जमिनीत वापर करून तांदूळ, वाटाणा, मिरच्या या पिकांच्या लागवडीवर काय परिणाम होतो, हे तपासले. या जीवाणूमुळे या पिकांची भरघोस वाढ होते. त्यामुळे हा जीवाणू शेती क्षेत्रात क्रांती करेल, असे शास्त्रज्ञांना वाटते. या जीवाणूंच्या वापरामुळे सेंद्रिय आणि शाश्वत शेतीला भरपूर चालना मिळेल, असा कयास आहे. शिवाय, या जीवाणूमुळे खताचा वापर कमी होईल. शास्त्रज्ञांनी या नवीन जीवाणूचे बारसे केले. त्याचे नाव ठेवलं 'पँटोइया टागोरी'. रवींद्रनाथ टागोर आणि त्यांचे चिरंजीव कृषितज्ज्ञ रतींद्रनाथ यांच्या सन्मानार्थ हे नामकरण आहे. हे दोघेही शाश्वत शेतीचे पुरस्कर्ते. त्यामुळे शाश्वत शेतीला मदत करणाऱ्या या जीवाणूच्या जातीचे नाव 'टागोरी' ठेवणे औचित्यपूर्ण आहे!

## शॉर्ट न्यूज

### धनादेश न वटल्याने एक वर्ष सश्रम कारावास

**श्रीगोंदा :** संस्थेचे थकबाकीपोटी दिलेला धनादेश न वटल्याने श्रीगोंदा येथील न्यायालयाने बाजीराव कदम या व्यक्तीस एक वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. याबाबत बाजीराव कोंडीराम कदम याने पिंपळगाव पिसा (ता. श्रीगोंदा) येथील कर्मयोगी कुंडलीकराव जगताप कुकडी साखर कारखान्यावर ऊस तोडणी वाहतूक यंत्रणा पुरवठा करण्यासाठी पाच लाख रुपये उचल घेतली होती. मात्र, ते पुरेशी यंत्रणा पुरवठा करू शकले नाही. या उचल रकमेपैकी थकबाकीची रक्कम दोन लाख ७७ हजार ५९४ रुपयांचा धनादेश बाजीराव कदम यांनी कारखान्याला वसुलीपोटी दिला होता.

### युवकांनी मतदार म्हणून नोंदणी करावी

**नगर :** जिल्ह्याची मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी नवयुवकांनी मतदार म्हणून नोंदणी करत मतदान प्रक्रियेत अधिक संख्येने सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात १४ व्या राष्ट्रीय मतदार दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी श्री. सालीमठ बोलत होते. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर जिल्हाधिकारी सुहास मापारी, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे आदी उपस्थित होते.

### बालविवाह जनजागृती सायकल रॅलीचे स्वागत

**अकोले :** तालुक्यातील बालविवाहांचे प्रमाण कमी करण्यासाठी लवकरच बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून कार्यरत असणाऱ्या ग्रामसेवकांची व लग्नातील घटकांची बैठक घेऊन हे प्रमाण कमी करण्यासाठी उपाययोजना राबवू, अशी ग्वाही आमदार डॉ. किरण लहामटे यांनी दिली. स्नेहालय युवा निर्माण, उडान प्रकल्प व रोटरी क्लब अकोले सेंट्रलच्यावतीने अकोले येथे बालविवाह जनजागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी ते बोलत होते.

### साहित्य परिषदेच्या अध्यक्षपदी अरविंद गाडेकर

**संगमनेर :** साहित्य परिषदेच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध व्यंगचित्रकार अरविंद गाडेकर यांची नियुक्ती करण्यात आली त्याबद्दल माजी महसूल मंत्री व आमदार बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते अरविंद गाडेकर यांचा सत्कार करण्यात आला. प्रसंगी माजी आ. डॉ. सुधिर तांबे, योगतज्ज्ञ डॉ. सुधाकर पेटकर, संगमनेर साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष किसन हासे, सचिव ज्ञानेश्वर राक्षे सहित मान्यवर उपस्थित होते.

### सायकलिंग स्पर्धेत आमदार राजळे सहभागी

**शेवगाव :** भारतीय जनता युवा मोर्चा शेवगाव-पाथर्डी तालुका व नमो चषक २०२४ भव्य क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवांतर्गत मंगळवारी आयोजित शेवगाव ते अमरापूर या दहा किलोमीटर अंतराच्या सायकलिंग स्पर्धेत आमदार मोनिका राजळे यांनी ट्रॅकसूट घालून स्पर्धेत सहभागी होऊन स्पर्धकांना प्रोत्साहित केले. शहरातील संत गाडगेबाबा चौकातून पहाटे सहाला या स्पर्धेला सुरुवात झाली. ज्येष्ठ नेते बापूसाहेब पाटेकर, भाजपाचे तालुकाध्यक्ष ताराचंद लोढे, भिमराज सागडे, उमेश भालसिंग आदीनी हिरवा झेंडा दाखवून हवेत फुगे सोडून स्पर्धेला सुरुवात केली.

# शाळांना चालू वर्षांत तब्बल ९२ सुट्टया!

■ वर्षभरातील सार्वजनिक सुट्टयांचे शासनाचे राजपत्र शाळांना प्राप्त
■ २४ सार्वजनिकसह ४४ उन्हाळी व इतर सुट्टयांचाही समावेश



**शिरुर : प्रतिनिधी**

**शाळांना चालू वर्षांत तब्बल ९२ सुट्टयांची मेजवानी राहणार असून, यामध्ये २४ सार्वजनिकसह ४४ उन्हाळी व इतर सुट्टयांचा समावेश आहे. वर्षभरातील २४ सार्वजनिक सुट्टयांचे महाराष्ट्र शासनाचे राजपत्र शाळांना प्राप्त झाले आहे.**

शाळेला सुटी मिळाली की विद्यार्थ्यांचा आनंद गगनात मावेनासा होतो. सुटीच्या दिवशी काय करायचे, कुठे फिरायला जायचे, काय खायचे आदी प्लॅनिंग ते करतात. शाळेत जाण्यापेक्षाही सुट्टया किती, याचीच बहुतांश विद्यार्थ्यांना जास्त उत्सुकता असते. आता नुकतेच २०२४ हे नवीन वर्ष सुरू झाले आहे. त्यामुळे शिक्षण विभागाने वर्षभरातील सुट्टयांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. विविध सण आणि उत्सवादरम्यान तब्बल ९२ सुट्टया यावर्षी विद्यार्थ्यांसह शिक्षकांना मिळणार आहे. वर्षभरातील २४ सार्वजनिक सुट्ट्यांचे महाराष्ट्र शासनाचे राजपत्र शाळांना मिळाले असून यामध्ये जाहीर करण्यात आलेल्या एकूण सुट्यांमध्ये सार्वजनिक २४, जिल्हाधिकाऱ्यांनी घोषित केलेल्या तीन, मुख्याध्यापक अधिकारातील सुट्या दोन, उन्हाळ्यातील ४४ आणि दिवाळीसाठी १० दिवसांच्या सुट्या, व इतर वेळेवर जाहीर झालेल्या सुट्टया राहणार आहे.

विशेष म्हणजे, दिवाळीच्या दहा दिवसाच्या सुट्टया रविवार आणि शासकीय सुट्टया वगळून राहणार असल्याचे समजते.

नवीन वर्षात धार्मिक व राष्ट्रीय सणांच्या २५ सुट्या असतील. त्यात शनिवार व रविवारला जोडून ९ सुट्या आल्याने सरकारी कर्मचाऱ्यांसाठी ही खुषखबर मानली जात आहे. नव्या वर्षात पाच सुट्या शनिवार-रविवारी असल्याचे दुःख असेल. सर्व सुट्टया मिळून सुट्यांचे शतक वर्षभरात नोकरदार पूर्ण करतील. राज्य सरकारने पुढील वर्षीच्या सार्वजनिक सुट्यांची यादी जाहीर केली. नव्या वर्षात सार्वजनिक व रविवारच्या मिळून ७४ सुट्या मिळणार आहेत. दुसरा व चौथा शनिवार मिळून सुट्यांचे दिवस शंभरवर होईल. आनंदाची बाब म्हणजे, शनिवार-रविवारला जोडून शुक्रवारी अथवा सोमवारी सुटीचा प्रसंग ९ वेळेस येत आहे.

### अशा आहेत सार्वजनिक सुट्टया

**प्रजासत्ताक दिन, छत्रपती शिवाजी महाराज जयंती, महाशिवरात्री, होळी, गुड फ्रायडे, गुढीपाडवा, रमजान इद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, रामनवमी, महावीर जयंती, महाराष्ट्र दिन, बुद्ध पौर्णिमा, बकरी इद, मोहरम, स्वातंत्र्यदिन, पारशी नववर्ष, गणेश चतुर्थी, इद-ए-मिलाद, महात्मा गांधी जयंती, दसरा, दिवाळी-लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा, गुरुनानक जयंती, ख्रिसमस.**

## वाचकांच्या लेखणीतून

# जिवाचा आरसा : महात्मा फुले काव्यदर्पण



जोतिबाचा बोल मनात परसा
जिवाचा आरसा पाहते मी
(क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले)

महात्मा ज्योतिबा फुले. १९ व्या शतकात महाराष्ट्रात होऊन गेलेले आद्य समाजसुधारक. त्यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याचा गौरव अनेक लेखकांनी करून ठेवला आहे. पां.सि.पाटील हे म.फुले यांचे आद्य चरित्रकार. त्यानंतरही म.फुले यांची अनेकांनी इंग्रजी आणि मराठी चरित्रे लिहिली. त्यांत धनंजय कीर यांनी लिहिलेले महात्मा जोतीराव फुले हे चरित्र विशेष गाजले (ते इंग्रजीतही आहे). माधव गोविंद रानडे यांचे न.र.फाटक यांनी लिहिलेले चरित्र अधिकृत मानले जाते. तसेच म.फुले यांचे धनंजय कीर यांनी लिहिलेले चरित्रही अधिकृत समजले जाते. इतके ते सुंदर आहे आणि ते खरेही आहे.

श्री संत सावता माळी युवक संघ, जुन्नर तालुका या सेवाभावी संस्थेने महात्मा फुले काव्यदर्पण हा प्रातिनिधिक कवितासंग्रह नुकताच वाचकांच्या भेटीस आणला आहे. यशोदीप पब्लिकेशन्स, पुणे यांनी हा काव्यसंग्रह प्रकाशित केला आहे. विशाल महाराज गडगे, संदीप वाघोले आणि प्रा. विजय लोंढे यांच्या संपादकत्वाखाली या ग्रंथाचा अवतार झालेला आहे. या संपादक मंडळाने चोखंदळपणे हा प्रातिनिधिक काव्यसंग्रह तयार केलेला दिसतो. या ग्रंथास डॉ श्रीपाल सबनीस, ज्येष्ठ विचारवंत, समीक्षक आणि ८९ व्या अ.भा.मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष यांनी सुंदर प्रस्तावना लिहिली आहे. डॉ अमोल कोल्हे, खासदार यांनी चार शब्द अभिनंदनाचे.... लिहिले आहेत. संपादकीयातून ग्रंथांचे रूपरंग विशद करण्यात आले आहेत.

ग्रंथ पेपर बाऊंड असून कागद आणि छपाई चांगली आहे. मुखपृष्ठावरील म. फुले यांचे चित्र बोलके आहे.

विशेष म्हणजे अज्ञानाच्या अंधारात ज्ञानाचा प्रकाश पेरणाऱ्या प्रत्येकास...
अशी या काव्यग्रंथाची अर्पणपत्रिका मला तर फारच काव्यमय वाटली!

या काव्यसंग्रहात एकूण ९० प्रातिनिधिक कविता निवडलेल्या आहेत. म. फुले यांच्या जीवन आणि कार्याचे विविध कवींनी आपापल्या दृष्टिकोनानुसार आणि काव्यप्रतिभेनुसार वर्णन केलेले आहे.

माझा बाप जोती या आपल्या कवितेत म. फुले यांच्या सामाजिक कार्याचे मर्म सांगताना प्रदीप देशमुख म्हणतात,

विझलेल्या वाती।अविद्येच्या पायी।
तूच ठायी ठायी। पेटविल्या।।

क्रांतीबा कवितेत प्रा. सागर कांबळे ज्योतिबांच्या विचारस्फुल्लिंगाचे वर्णन करतात,

तुझ्याच रूपानं बाहेर पडला शोषितांचा पहिला हुंकार/आणि एल्गारही...

प्रणाली देशमुख मानवतेचा वसा या सुंदर कवितेत ज्योतिबाचे ध्येय सांगताना म्हणतात,

अनाथ दुबळे जवळ घेउनी मानवतेचा एक वसा
नको अज्ञानी समाज, ज्ञानसाधनेचा घेतला वसा

क्रांतिदूत कवितेत बाबासाहेब जाधव वर्णन करतात,

शिक्षणाचे ज्ञानमळे/सावीसवे पिकविले/
दीनानाथ दिला आधार/गुलामांना शिकविले

ज्योतिबांची सहचारिणी सावित्रीबाईबद्दल राजेंद्र बापूराव उगले म्हणतात,

सत्यवानाचे प्राण आणण्या
गेली सती सावित्री स्वर्गात
पण ज्योतिबाच्या सावित्रीने
स्वर्ग शोधला वर्गात..!

फारच मार्मिक आणि सुंदर वर्णन आहे हे!

संपादक धन्य जोतिराव या नाना ढवळे यांच्या कवितेबद्दल लिहितात,

...यांची प्रासयुक्त रचनाही सुंदर आहे.

पत्नी सावित्रीबाई, कुमारिकांची झाली दाई,
झिजविली चंदनी काया
होती अशिक्षित, झाली शिक्षित, केल्या
दीक्षित कित्येक आयाबाया

या रचनेतील शब्द कळेबरोबर अर्थकळाही लक्षणीय आहे.

नंदलाल देवमन अहिरे यांच्या महात्मा या कवितेत भिडे वाड्याचे ऐतिहासिक आणि प्रेरणाप्रद कार्य आणि महत्त्व आढळते. ते सुंदर वाटले.

प्रा. जयसिंग गाडेकर क्रांतीचे अग्रणी या कवितेत म.फुले यांचे चरित्र आणि कार्य थोडक्यात वर्णन करून त्यांचा त्रिवार जयजयकार करतात.

जोतिबा या कवितेत विजय लोंढे यांनी केलेले वर्णन अती सुंदर वाटले. ते म्हणतात,

आता आम्ही.../ विचारांच्या उंटावर बसून/वाळवंटाचे नंदनवन/ करत आहोत/ उद्याच्या भविष्यासाठी

रुपाली अवचरे दिल्या नव्या आशा या आपल्या कवितेत समता आणि बंधुता शिकविणाऱ्या ज्योतिबांविषयी म्हणतात,

समता आणि बंधुतेची शिकवली परिभाषा
ज्योती, तू जागवल्या, दिल्या नव्या आशा

मुलींसाठी उघडलेली पहिली शाळा, अस्पृश्यांसाठी पाण्याचा हौद खुला करणे, ज्योतिषांनी लिहिलेले शेतकऱ्यांचा आसूड, गुलामगिरी, सार्वजनिक सत्यधर्म आदी ग्रंथ, जोडीला सावित्रीबाईची साथ या गोष्टीचे सुंदर वर्णन कवींनी केलेले आहे. त्या सगळ्यांचा इथे उल्लेख करता येऊ शकत नाही. तशी अपेक्षाही नसते. त्यासाठी मूळ काव्यसंग्रहच वाचला पाहिजे.

**नाना ढवळे,** ८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर.

# उल्हासनगर परिमंडळात गुन्हेगारीला ब्रेक!

■ पारनेरचे सुपुत्र पोलीस उपायुक्त डॉ.सुधाकर पठारे यांची प्रभावी कामगिरी
■ अंबरनाथ, बदलापूर, विठ्ठलवाडी उल्हासनगर मधील गुन्ह्यांची संख्या घटली

**नवी मुंबई : नाना करंजुले**



**पुणे, नवी मुंबई प्रमाणेच पोलीस उपायुक्त डॉ. सुधाकर पठारे यांनी आपल्या कार्यपद्धतीची उल्हासनगर झोनमध्ये छाप पडली आहे. त्यामुळे सन २०२२ च्या तुलनेत २०२३ मध्ये गुन्हेगारीला बऱ्याच अंशी चाप बसला आहे.उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर विठ्ठलवाडी या परिसरात गुन्ह्यांची संख्या कमी झाली आहे. हा आलेख आणखी खाली आणण्याचा संकल्प डॉ .पठारे यांनी केला आहे. त्यानुसार वेगवेगळ्या प्रभावी उपाययोजना करण्याचे काम त्यांनी हाती घेतले आहे. विशेष म्हणजे हे अधिकारी पारनेर तालुक्यातील वाळवणे गावचे आहेत. त्यांनी या माध्यमातून आपले गाव तालुका आणि जिल्ह्याचे नावलौकिकात आणखी भर टाकली आहे.**

पारनेर स्थित मुंबईकर असणारे डॉ. सुधाकर पठारे अत्यंत कार्यक्षम, कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून ओळखले जातात. कायदा आणि सुव्यवस्थेचे रक्षण करणे, त्याचबरोबर गुन्हे अन्वेषण आणि प्रगटीकरण यामध्ये त्यांचा हातखंडा आहेच. मात्र त्या पलीकडे जाऊन गुन्हेगारी नियंत्रण करण्यावर वरिष्ठ अधिकारी म्हणून डॉ. पठारे त्यांचा विशेष भर असतो. त्यासाठी चौकटीच्या बाहेर जाऊन त्यांनी पुणे येथे उपायुक्त असताना अनेक तरुणांना गुन्हेगारीपासून दूर केले. त्यांचे समुदेशन करत असताना पुनर्वसनासाठी विशेष प्रयत्न केले. डॉ पठारे यांचे सोशिल पोलिसिंगचा पुणे पॅटर्न अनुकरणीय आहे. त्यानंतर त्यांनी नवी मुंबई सुद्धा मराठा आरक्षणाचे आंदोलन अतिशय शिताफिने हाताळले. राज्य गुप्त वार्ता विभागातही त्यांनी प्रभावी काम केले. ठाणे पोलीस दलामध्ये रुजू झाल्यानंतर विशेष शाखेचे पोलीस उपायुक्त म्हणून त्यांनी आपल्या कामाची छाप पाडली. दरम्यान त्यांच्याकडे परिमंडळ ५ उल्हासनगरची जबाबदारी सोपवण्यात आली.

या परिसरामध्ये गुन्हेगारी फोफावली होती. मात्र पदभार घेतल्यानंतर डॉ. सुधाकर पठारे सर्व अधिकाऱ्यांना विश्वासात घेतले. त्यांना प्रोत्साहन आणि पाठबळ दिले. त्याचबरोबर सोशल पोलिसिंगवर भर दिला. उल्हासनगर, मध्यवर्ती, विठ्ठलवाडी, हिल लाईन, अंबरनाथ, शिवाजीनगर, बदलापूर पूर्व आणि पश्चिम या आठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत होणाऱ्या गुन्ह्यांची माहिती घेतली. त्याचबरोबर गुन्हेगारांची पार्श्वभूमी तपासणी, गुन्हे कशाप्रकारे घडतात याचा सखोल अभ्यास केला. रेकॉर्ड वरील गुन्हेगार तपासले तसेच गुंडा रजिस्टर वरील नोंदी सुद्धा पाहिल्या त्यानंतर या परिसरामध्ये गुन्ह्यांचे प्रमाण कसे कमी होईल या अनुषंगाने त्यांनी गेल्या काही महिन्यांमध्ये काम केले. त्याचा सकारात्मक परिणाम २०२३ च्या गुन्ह्यांच्या यादीवर दिसून आला.२०२२ च्या तुलनेत गंभीर आणि महत्त्वाच्या गुन्ह्यांमध्ये घट झाल्याचे निदर्शनास आले.

यासाठी सहाय्यक पोलीस आयुक्त यांच्यासह वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे पोलीस निरीक्षक आणि इतर अधिकाऱ्यांनी पोलीस उपायुक्त डॉ सुधाकर पठारे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष परिश्रम घेतले. त्याचबरोबर कर्मचारी वर्ग सुद्धा अधिक अलर्ट आणि दक्ष राहिल्याने उल्हासनगर झोन मधील गुन्हेगारीला ब्रेक लावण्यात बऱ्यापैकी ठाणे पोलिसांना यश मिळाल्याचे दिसून आले. अर्थात तत्कालीन आणि सध्याचे पोलीस आयुक्त, सह पोलीस आयुक्त, अप्पर पोलीस आयुक्तांचे सुद्धा उल्हासनगर झोन मधील अधिकारी आणि पोलीस कर्मचाऱ्यांच्या टीमला मार्गदर्शन मिळाले.

### वाहन चोरीमध्ये मोठ्या प्रमाणात घट!

**उल्हासनगर झोन मध्ये वेगळ्या पोलीस ठाण्याच्या अखत्यारित २०२२ ला जवळपास ३९६ इतके वाहने चोरीला गेले होते. मात्र हे प्रमाण २०२३ ला ९० ने कमी झाल्याचे दिसून आले. त्यामुळे बऱ्याच अंशी वाहनचालकांना दिलासा मिळाला आहे. या चोऱ्यांमध्ये यापुढे आणखी घट होईल असा विश्वास ठाणे पोलिसांनी व्यक्त केला आहे. त्याचबरोबर २०२२ ला ९९ दरोड्याचे गुन्हे घडले होते. ती संख्या ७७ वर येऊन ठेपली आहे. सोनसाखळी चोरांना सुद्धा लगाम घालण्याचे काम उल्हासनगर झोन मधील पोलिसांनी केले आहे. ही संख्या ३७ ने कमी झाली आहे. त्याचबरोबर खुनाच्या गुन्ह्यामध्ये चार ने घट झाली आहे. खुनाच्या घटना ५२ वरून २६ वर आले आहेत. रॉबरीची संख्या सुद्धा २२ ने कमी झाली आहे.**

### कारवाई बरोबरच समुपदेशन आणि पुनर्वसन!

**गुन्हे नियंत्रण करण्यासाठी ठाणे पोलिसांनी उल्हासनगर झोनमध्ये विशेष प्रयत्न व परिश्रम पोलीस उपायुक्त डॉ सुधाकर पठारे यांच्या मार्गदर्शनाखाली घेतले आहेत. गेल्या काही महिन्यांमध्ये सराईत गुन्हेगारांना तडीपार करण्यात आले आहे. ही संख्या सर्वात मोठी असून काही गुन्हेगारांवर मोक्काअंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. त्याचबरोबर गुन्हेगारांचे समुपदेशन आणि पुनर्वसन करण्यातही पोलीस उपायुक्त डॉ. सुधाकर पठारे विशेष पुढाकार घेतल्यामुळे साहजिकच गुन्हेगारीचे प्रमाण या भागामध्ये कमी झाल्याचे दिसून आले.**

### बाल गुन्हेगारीवर नियंत्रणासाठी विशेष प्रयत्न!

**उल्हासनगर झोन मधील बाल गुन्हेगारी कमी व्हावी त्याला पूर्णपणे पाय बंद घालता यावे यासाठी पोलीस उपायुक्त डॉ सुधाकर पठारे यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांनी यासाठी शिक्षकांची कार्यशाळा घेतली. त्या माध्यमातून मुलांनी गुन्हेगारीकडे वळू नये त्यांचे भविष्य उज्वल रहावे याकरता शिक्षकांनी काय नेमके प्रयत्न करायचे याबाबत त्यांनी अतिशय उत्तम मार्गदर्शन केले.**

(पान १ वरून)

### मराठा योद्धा जिंकला ! मनोज जरांगेंचे आंदोलन मागे

गुलाल उधळून आपण गावी वापस जाणार आहोत, असे सांगतानाच आम्ही विजयी सभा घेणार असल्याचे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

**आरक्षणासाठी बलिदान देणाऱ्यांच्या कुटुंबियांना मदत करणार**

मतासाठी नाही तर विकासासाठी आम्ही निर्णय घेत आहोत. मराठा आरक्षणांच्या आंदोलनात ज्या लोकांनी बलिदान दिले त्यांच्या कुटुंबियांना आपण मदत करणार आहोत.हे सरकार सर्वसामान्य माणसांचे सरकार आहे.आम्ही कोर्टात टिकणारे आरक्षण देणार आहोत. कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी सरकार शिबीर घेणार आहे, असे सांगतानाच मुख्यमंत्र्यांनी मराठा संघर्ष नेता मनोज जरांगे पाटील असा उल्लेख करण्यात आला.

**गालबोट न लावता आंदोलन यशस्वी : शिंदे**

आपल्या आंदोलनाचा त्रास कुणाला होऊ नये यासाठी आपण सर्वांनी जे काळजी घेतली ती अतिशय कौतुकास्पद आहे. मराठा समाज बांधवांचे मी आभार मानतो, असे म्हणतानाच मी देखील मराठा शेतकरी कुटुबांतील मुलगा असल्याने मला आपली परिस्थितीची जाण असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

**आरक्षणाबद्दल दिलेला शब्द पूर्ण केला- शिंदे**

मी आरक्षणाबद्दल शिवरायांची शपथ्थ घेऊन आरक्षण देऊ असे म्हटले होतो, मी दिलेला शब्द पूर्ण केला असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

**मराठा-ओबीसी वाद होऊ देणार नाही**

कुणबी प्रमाणपत्र जिकडून घ्यायचे तिकडून घ्यावे पण आरक्षणात मराठा बांधवांनी जावे असे म्हणत मनोज जरांगे यांनी मराठा समाजाच्या नादी लागायचे नाही, असा इशाराच दिला आहे. आम्ही ओबीसी समाजाला आमचाच मानतो, काही जण आमच्या दोघांमध्ये भांडणे लावण्याचा प्रयत्न करत आहे. आम्ही गावखेड्यात एकमेकांच्या सोबतीने राहतो असे म्हणत आम्हाला विरोध करू नका आणि वाद वाढवू नका, असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

शिंदे समितीला १ वर्षांची मुदतवाढ द्यावी : जरांगे

मराठा बांधवांना माझा मानाचा शिवराय असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी भाषणास सुरूवात केली आहे. मराठा आरक्षणाच्या लढाई बाबत हा संघर्ष सुरू होता, आपल्या ५४ लाख मराठा समाजाच्या नोंदी सापडल्या त्या लोकांच्या घरच्यांना देखील आरक्षण मिळावे यासाठी आपण हा संघर्ष केला. यासाठी आपले प्राण गमावलेल्या अण्णासाहेब पाटील, मेटे साहेब आणि साडे तीनशे लोकांना न्याय देण्याचे आपले प्रयत्न होते. जिथे लग्न ठरतात ते सगेसोयरे असे म्हणतानाच ज्यांनी हा अध्यादेश काढणाऱ्या मुख्यमंत्री शिंदे यांचे खूप खूप आभार असे जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

मनोज जरांगे पाटील पुढे बोलताना म्हणाले की, मी म्हणालो होतो ना की आरक्षण मिळावल्याशिवाय वापस येणार नाही, आणि आज आरक्षण मिळाले. मुख्यमंत्री शिंदे यांनी जे राजपत्र काढले आहे, त्यांची कुणबी नोंद मिळाली त्यांच्या सर्व सगेसोयऱ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे. ३०० लोकांनी मराठा आरक्षणासाठी बलिदान दिले. शिंदे समितीला १ वर्षांची मुदतवाढ देण्यात यावी, असे म्हटले आहे. १८८४ शी जनगणना आहे ती आपण स्वीकारावी, कारण मराठवाड्यात कमी नोंदी सापडल्या आहेत.

**मुख्यमंत्री शिंदे आणि जरांगे यांच्यात फोनवर चर्चा**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटलांनी २० जानेवारीला जालना ते मुंबई पदयात्रा सुरू केली होती.२६ जानेवारी रोजी जरंगे आणि त्यांचे लाखो समर्थक नवी मुंबईतील वाशी येथे पोहोचले. जरंगे यांनी मुंबईतील आझाद मैदानावर उपोषणाचा इशारा दिला होता.दरम्यान, महाराष्ट्र शासनाच्या अधिकाऱ्यांचे पथक रात्री दहाच्या सुमारास वाशी येथे पोहोचले आणि त्यांनी जरांगे यांची भेट घेतली. जरांगे हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी फोनवर बोलत असल्याचे त्यांनी सांगितले.

**अडचण आल्यास लढत राहील**

हा लढा माझ्या एकट्याचा नाही तर संपूर्ण मराठा समाजाचा असल्याची प्रतिक्रिया त्यांनी दिली. आरक्षण मिळण्याचे श्रेय पूर्णपणे मराठा समाजाचे असल्याचे त्यांनी नम्रपणे सांगितले. भविष्यात कोणत्याही अडचणी आल्या. जीआर संदर्भात असो वा समाजाविषयी इतक कोणती अडचण आली तर लढत राहण्याचे आश्वासन जरांगे पाटील यांनी दिले.मराठा आंदोलन संपवत नसून त्याला स्थगिती देत असल्याचे मनोज जरांगे यांनी म्हटले आहे.

### फटाके फोडीत आ. नीलेश लंके यांचा आनंदोत्सव !

आला होता. दरम्यान, मनोज जरांगे हे दि. २० जानेवारी रोजी आंतरली सराटी येथून लाखो मराठा बांधवांच्या उपस्थितीत मुंबईच्या दिशने पदयात्रेने निघाल्यानंतर पारनेर नगर मतदारसंघात त्यांचे आगमन झाल्यानंतर लंके व त्यांच्या हजारो समर्थकांनी जरांगे यांचे कामरगांव शिवारात स्वागत करीत जरांगे यांच्या आंदोलनास पाठींबा दिला होता. जरांगे यांच्या या लढयास यश आल्यानंतर लंके यांनी फटाक्यांची आतिषबाजी करीत आनंदोत्सव साजरा केला.

### मराठा आरक्षणाचे पारनेर शहरात स्वागत

मार्गी लागला आहे. आता यापुढील काळातही मराठा बांधवांनी समाजाच्या प्रश्नांसाठी अशीच एकजुट दाखवावी अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. पारनेरचा लाल चौक, बसस्थानक चौक, कॉलेज रोड तसेच शहरात विविध ठिकाणी फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली.

### भाळवणीकरांना आनंदी आनंद गडे!

मराठा आरक्षणाबाबत शासनाने दिलेले डेडलाईन न पाळल्याने जरांगे पाटलांनी पुन्हा आंदोलन सुरू केले. त्यानंतर भाळवणी येथील युवक कार्यकर्ते सुधाकर रोहोकले यांनी २६ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर या कालावधीत पुन्हा उपोषणाचा मार्ग पत्करला होता.आज मराठा आरक्षणाची घोषणा झाल्यानंतर या आंदोलनकर्त्यांसहित भाळवणी ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले असून आज (शनिवारी) सायंकाळी गावातून पुन्हा विजय रॅली काढण्यात येणार आहे.

### मराठा एकजुटीचा विजय असो !

विद्यार्थी, विद्यार्थीनींनी एकत्र येत आनंदोत्सव साजरा केला. अनेक दिवसांपासून जरांगे पाटील मराठा आरक्षणासाठी लढा देत होते. लाखोंच्या संख्येने मराठा बांधव एकवटलेले असतानाही कोठेही गालबोट लागले नाही. मराठा समाजाच्या रेटयाची सरकारने दखल घेत सरकारने शनिवारी घेतलेला निर्णय ऐतिहासिक आहे. जरांगे पाटील यांनी निरपेक्ष व निःस्वार्थी वृत्तीने नेतृत्व केल्याने हे यश प्राप्त झाल्याचे उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे यांनी सांगितले.

# आमदारांच्या सन्मानाचे हंगेकरांना कौतुक!

## ■ प्रजासत्तादिनी केला सत्कार ■ मायभूमीचा सत्कार औरच : आ.लंके



■ मानद डॉक्टरेट तसेच आदर्श लोकप्रतिनिधी पुरस्कार मिळाल्याबद्दल आ. नीलेश लंके यांचा हंगे येथे सत्कार करण्यात आला.

### आम्ही कौतुकाचे धनी

**थोर स्वातंत्र सेनानी सेनापती बापट, ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या पाठोपाठ आ. नीलेश लंके यांच्यामुळे राज्यात देशात पारनेरची ओळख निर्माण झाली आहे. कुठेही गेले तरी पारनेरचे नाव पुढे आले की आ. नीलेश लंके यांचे नाव कौतुकाने घेतले जाते. याच कौतुकाचे धनी होण्याचे भाग्य आम्हास लाभले, यापेक्षा अजून काय हवे ?**

**राजेंद्र शिंदे**
**सरपंच, हंगे**

**हंगे : प्रतिनिधी**

**कोरोना रेस्कू ऑपरेशनमधील दिलेल्या योगदानाबद्दल फ्रान्सच्या थेम्स इंटरनॅशनल युनिर्व्हसिटीच्या वतीने देण्यात आलेली मानद डॉक्टरेट तसेच प्रा. मधु दंडवते जन्मशताब्दी महोत्सव समितीच्या वतीने आ. नीलेश लंके यांना देण्यात आलेल्या आदर्श लोकप्रतिनिधी पुरस्काराचे हंगे ग्रामस्थांना कौतुक आहे. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून ग्रामस्थांच्या वतीने ग्रामपंचायत कार्यालयात आ. लंके व त्यांच्या पत्नी राणीताई लंके यांचा हृदय सत्कार करण्यात आला.**

लंके दाम्पत्याच्या सत्काराप्रसंगी सरपंच राजेंद्र शिंदे, उपसरपंच नीता रासकर, सोसायटीचे चेअरमन बापू महाराज दळवी, व्हा. चेअरमन थोरात ताई, प्रतिष्ठाणचे अध्यक्ष सचिन साठे, सेवा संस्था व ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा माया साळवे यांच्यासह ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते. राणीताई लंके व सरपंच शिंदे यांच्या हस्ते ग्रामपंचायतमध्ये तर जिल्हा परिषदेच्या शाळेत आ. नीलेश लंके व पोपटराव इथापे यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले.

ग्रामस्थांनी केलेल्या सत्कारामुळे आ. नीलेश लंके भाऊक झाले होते. ते म्हणाले, माझ्या गावाच्या खंबीर पाठबळामुळे मी विधानसभेत पोहचलो. पुढील वाटचाल करताना विविध क्षेत्रात मी जे काम केले त्याचे राज्यात देशात नव्हे तर परदेशातही कौतुक झाले. या कौतुकाचा माझ्या गावचा प्रत्येक जण भागीदार आहे. आजवर अनेक सन्मान झाले मात्र मायभूमीचा सत्कार औरच असतो. यापुढील काळातही हंगे गावाचे नाव अभिमानाने घेतले जाईल असे काम आपल्याकडून केले जाईल. ग्रामस्थांनी अशीच खंबीर साथ देत माझ्या वाटचालीस पाठबळ द्यावे असे आवाहन आ. लंके यांनी केले.

# पारनेर पब्लिकमध्ये छत्रपतींच्या जीवनावर कार्यक्रम

## शिवरायांचे जीवन व शिकवणीची विद्यार्थ्यांना ओळख

**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर शहरातील पारनेर पब्लिक स्कुल व ज्युनिअर कॉलेज येथे प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून २६ जानेवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवन व शिकवण या विषयावरील थीम घेउन विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य गिताराम म्हस्के यांनी ही माहीती दिली.**



■ पारनेर पब्लिक स्कुलमध्ये प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन व शिकवण या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाप्रसंगी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, माँ जिजाऊ यांच्या वेशभुषा करीत पोवाडा, छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य वर्णन करणा-या गीतांचे सादरीकरण केले. सांस्कृतीक कार्यक्रम सादर करताना देशाचा सांस्कृतीक वारसा जपण्याचा संदेशही विद्यार्थ्यांनी दिला. देशभरातील विविध राज्यांच्या वेशभूषेसह तेथील स्थानिक भाषेचा वापर करीत राष्ट्रीय एकात्मता, धर्मनिरपेक्षता, सर्वधर्मसमभाव या मुल्यांची जपवणूक करण्याचाही संदेश देण्यात आला. प्राचार्य गिताराम म्हस्के यांनी या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भुषविले.म्हस्के यांनी उपस्थित विद्यार्थी, पालक यांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देत सर्वांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचे, कार्याचे अनुकरण करण्याचे आवाहन केले.

यावेळी विद्यालयात उपस्थित पालकांनी छत्रपतींचे विचार व शिकवण ही थीम घेऊन विद्यालयाचे प्राचार्य गितारास म्हस्के यांच्या संकल्पनेतून अतिशय सुंदर कार्यक्रमाचे आयोजन केल्याच्या भावना व्यक्त केल्या. दर्जेदार शिक्षणाबरोबरच सांस्कृतीक वारसा जपण्याचे काम विद्यालयाकडून करण्यात येत असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

### पारनेर पब्लिकचे वेगळेपण !

**प्राचार्य गिताराम म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली पारनेर पब्लिक स्कुलने जिल्हयात वेगळेपण निर्माण केल्याच्या प्रतिक्रिया पालकांनी दिल्या. परीक्षा कोणतीही असो बोलबाला फक्त पारनेर पब्लिक स्कुलचाच असतो असे सांगतानाच गुणवत्तेबरोबरच विद्यार्थी विविध क्षेत्रात निपुण कसा होईल याची काळजी विद्यालयाकडून घेतली जात असल्याचा गौरवही पालकांनी केला.**

कार्यक्रमास संस्थेच्या अध्यक्षा सविता म्हस्के, नीलेशा पठारे, अशोक चौरे, सचिन वाघ, सचिन मोढवे, विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक उपस्थित होते. शिक्षक दिपक जाधव यांनी या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन केले. तर दत्तात्रेय काकडे यांनी आभार मानले.

# निघोज परिसरासाठी आ. लंके यांच्या माध्यमातून १९ कोटी चा निधी

## ■ विविध विकास कामांचे मंगळवारी भुमिपूजन ■ चेअरमन वसंत कवाद यांची माहिती

**निघोज : प्रतिनिधी**



**निघोज आणि परिसराच्या विकासासाठी आ.नीलेश लंके यांच्या माध्यमातून १९ कोटी ६५ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असून या कामांचे भुमिपूजन आ.लंके यांच्या हस्ते तसेच मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकरशेठ कवाद यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि.३०) होणार असल्याची माहितीबाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष वसंत कवाद यांनी दिली.**

याबाबत अधिक माहिती देताना श्री.कवाद यांनी सांगितले की,निघोज ते कॅनॉल ते पिंपरी जलसेन रस्ता सुधारणे ४ कोटी रुपये, जगप्रसिध्द रांजणखळगे परिसरातील पर्यटक विसावा केंद्र अडीच कोटी रुपये, मुका मळा येथे बंधारा एक कोटी ६३ लाख रुपये, जगप्रसिध्द रांजणखळगे परिसरात पर्यटक भोजन कक्ष एक कोटी तीस लाख रुपये, काळे वस्ती बंधारा ७५ लाख रुपये, कवाद वस्ती बंधारा ६८ लाख रुपये, निघोज ते कुंड मंदिर रस्ता कॉंक्रटीकरण ६५ लाख, निघोज ते बोदगेवाडी रस्ता ६० लाख रुपये, मळगंगा मंदिर सुशोभीकरण ५५ लाख रुपये, लाळगे मळा बंधारा ५४ लाख, निघोज हायवे ते शिरसुले रस्ता ५० लाख, लाळगे मळा बंधारा नंबर ३, ४५ लाख रुपये, खोडा येथील बंधारा नंबर पाच ४२ लाख रुपये, तनपुरे वाडी बंधारा नंबर चार ४२ लाख रुपये निघोज मोरवाडी, रसाळवाडी,शिववाडी, काळे वस्ती, पुनर्वसन वस्ती सिंगलफेज करणे ४० लाख रुपये, वडगाव गुंड ते देवीभोयरे शिवरस्ता ३० लाख रुपये, रामदास वरखडे दुकान ते कोंडीभाऊ लाळगे रस्ता २४ लाख रुपये, कै. लक्ष्मण लामखडे वस्ती ते संतोष नवले वस्ती २४ लाख रुपये, कवाद वस्ती, जाधव मळा ते लक्ष्मण लंके वस्ती २४ लाख रुपये, गाडीलगाव रोड ते म्हसोबा डोह, सचिन लंके मळा ते राजू ढवळे वस्ती २४ लाख रुपये, कॅनॉल ते दिपक लाळगे वस्ती २४ लाख रुपये, लहू पानमंद वस्ती, ज्ञानेश्वर लाळगे मळा ते गणेश लाळगे मळा रस्ता २४ लाख रुपये, शांताराम कवाद वस्ती ते रामदास वरखडे दुकान २४ लाख रुपये, शिवाजी ढवळे वस्ती ते नवनाथ ढवळे मळा ते खान्याबा मळा रस्ता २४ लाख रुपये, मोरवाडी येथील संत सावता मंदिरासमोर सभामंडप २० लाख रुपये

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सामाजिक सभागृह २० लाख रुपये, जिल्हा परिषद शाळा पांढरकर वाडी खोली बांधकाम दुरुस्ती १२ लाख रुपये, पांढरकर वाडी स्मशानभूमी १० लाख रुपये, शिरुर रोड हवलदार वस्ती ते गवराम ढवळे रस्ता १० लाख रुपये, सावता महाराज मंदिर सभामंडप १० लाख रुपये, रसाळवाडी, तनपुरे वाडी शाळा दुरुस्ती चार लाख रुपये अशाप्रकारे १९ कोटी ६५ लाख रुपये निधी आमदार नीलेश लंके यांच्या माध्यमातून उपलब्ध झाला असून मंगळवारी (दि.३०) रोजी होणाऱ्या या कार्यक्रमास जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष तसेच नीलेश लंके प्रतिष्ठान यांनी केले आहे.

# अन्यथा १५ फेब्रुवारीपासून शेतरस्त्यांसाठी जिल्हाभर आंदोलन करू

## ■ शरद पवळे यांचा इशारा ■ तहसीलकडून फसव्या सप्तपदी, महाराजस्व अभियानाचा आरोप

**सुपा : प्रतिनिधी**

**शेतरस्त्यांसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी सप्तपदीसह महाराजस्व अभियान जिल्हाभर राबविले मात्र तहसील विभागाकडून शेतकऱ्यांसह जिल्हाधिकाऱ्यांचीही दिशाभूल होत आहे. शेतरस्त्यांची अंमलबजावणी न करणाऱ्या अधिकाऱ्यांना निलंबित करावे अन्यथा १५ फेब्रुवारीपासून आंदोलन करण्याचा इशारा शिवपाणंद रस्त्याचे प्रणेते शरद पवळे यांनी दिला आहे.**



### आम्ही कौतुकाचे धनी

**सरकार बदलते शासन निर्णय बदलतात शासन निर्णयांची प्रशासनाकडून जोरदार जाहिरात केली जाते प्रत्यक्ष अंमलबजावणी काही होत नाही.नगर जिल्ह्यात राबवलेल्या सप्तपदीसह महाराजस्व अभियानातुन शेतरस्त्यांचा प्रश्न सुटेल अशी आशा शेतकऱ्यांना होती परंतु जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला तहसील प्रशासणे केराची टोपली दाखवली त्यामुळे जिल्हयात शेतरस्त्यांचा प्रश्न जैसे थेच आहे.**

**शरद पवळे**
**शिवपाणंद शेतरस्ता प्रणेते.**

या संदर्भात बोलताना पवळे म्हणाले की, दिवसेंदिवस शेतीची वाढत चाललेली तुकडेवारी, नांगरणी,पेरणी, मशागती सह शेतीसाठी दळवळणासाठी लागणारी यंत्रसामुग्री, शेतकऱ्यांचे दुग्धव्यवसाय, मत्स्यपालन, कुक्कुटपालन, शेळीपालन , गोपालन आदी शेती पुरक व्यवसायांसाठी शेतकऱ्यांचे शेतात वाढते वास्तव्य त्यातच सर्पदंश, विज पडणे, पुर येणे आग लागणे आदी नैसर्गिक आपत्तीच्या घटना, शेतमाल बाजारपेठेत पोहचवण्यासह शालेय विद्यार्थ्यांचा रोजचा दळवळणचा प्रश्न शेतरस्त्यांच्या अभावी गंभीर झाला असुन बिटीशकालीन शेतरस्त्यांचा तुकडेवारीमुळे मोठे गंभीर प्रश्न होत चालला आहे. पुर्वी अनेक ब्रिटिशकालीन शिवपानंद शेतरस्त्यांच्या हद्दी निश्चित होत्या परंतु त्याचे कुठल्याही प्रकारचे सर्वेक्षण प्रशासकीय पातळीवरून होत नाही, अनेक वहिवाटीच्या रस्त्यांच्या नोंदी होत नाही त्याचबरोबर वडिलोपार्जित शेतीतील शेतरस्त्यांचा प्रश्न आपापसात सुटणे कठीण झाले असुन अनेक फौजदारी स्वरूपाच्या घटना सातत्याने घडताना दिसत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पिढीजात तंटे उभे निर्माण होण्याची भिती निर्माण झाली असुन ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना अलर्ट बनवण्यापासून ते प्रशासकीय न्यायालयीन संघर्ष जीवनाचा भाग बनला आहे. यातुन पुढच्या पिढीच मोठ नुकसान होताना दिसत आहे. त्यातच सरकार जाहिरातींवर मोठा खर्च करत आहे. प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे झोपलेल्या प्रशासनाला जागे करण्यासाठी शिवपाणंद शेतरस्ता चळवळीच्या माध्यमातून प्रशासकीय, न्यायालयीन लढ्याबरोबर जनजागृती जनआंदोलनाच्या माध्यमातून शेतरस्त्यांच्या प्रश्नाला ज्वलंतपणा देवून शेतकरी समृद्ध,गावसमुद्ध,महाराष्ट्र समृद्ध व्हावा यासाठी प्रयत्नशील असुन अहमदनगर जिल्ह्यात या चळवळीची पाळेमुळे घट्ट होत आहे. चळवळीचा ज्वलंतपणा लक्षात घेवून जिल्हाधिकाऱ्यांनी शेतरस्त्यांसाठी सप्तपदीसह महाराजस्व अभियान जिल्हयात राबवले परंतु तहसील कार्यालयांकडून शेतकऱ्यांसह जिल्हाधिकाऱ्यांची दिशाभूल करत ही अभियाने कागदावरच राहिली आहेत दिवसेंदिवस तहसील कार्यालयांवर शेतरस्ता केसेस वाढत चालल्या असुन तहसील प्रशासन ढिम्म पद्धतीने काम करत आहे.

नगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी महाराष्ट्र शिवपाणंद शेतरस्ता चळवळीच्या माध्यमातून पुन्हा तातडीने पारदर्शक महाराजस्व अभियान राबवावे, ग्रामशेतरस्ता समित्यांची स्थापना करावी, शिव पाणंद शेतरस्त्यांच्या हद्द निश्चिती करून नकाशांचे सर्वेक्षण करत नंबरी हटवणाऱ्यांना दंड सुरू करावेत, तहसीलवर शुन्य रस्ता केसेस ठेवण्यात त्याचबरोबर जिल्हाधिकाऱ्यांच्या महाराजस्व अभियानाची अंमलबजावणी न करणाऱ्या जिल्हयातील तहसीलदारांसह शेतरस्त्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने निलंबीत करावे सदर मागण्या १४ फ्रेबुवारी पर्यंत पूर्ण न झाल्यास १५ फेबुवारीपासून जिल्हाभर विविध तालुक्यांमध्ये तहसील कार्यालयासमोर शेतकरी आमरण उपोषण धरणे आंदोलन आदी आंदोलनाच्या माध्यमातुन न्यासासाठी प्रशासनाला जाब विचारणार आहे. याबाबत निवेदन महाराष्ट्र सज्य शिवपाणंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने अहमदनगर जिल्हाधिकारी कार्यालयाकडे देण्यात आले. यावेळी शरद पवळे, नाथा शिंदे, रामदास लोणकर, ॲड.कडूस पाटील, सागर सोनटके,गोरख वारे, विनोद वारे, संजय साबळे, सिताराम तरटे, राजेंद्र देठे, दिपक गवांदे, दशरथ वाळूंज , भाऊसाहेब वाळूंज,बाळासाहेब भोसले, गोरख रेवाळे, पोपर पवार, बबन गुंड,गणेश देठे, बाळसाहेब देठे आदी शेतकरी उपस्थित होते.

# श्रमसंस्कार शिबिरातून वैचारिक तरुण घडविण्याचे कार्य

## सचिन वराळ पाटील यांचे प्रतिपादन



**निघोज : प्रतिनिधी**

**श्रमसंस्कार शिबिरातून वैचारिक तरुण घडविण्याचे काम होत असून ज्येष्ठांचे अनुकरण करीत आजच्या युवकांनी सामाजिक कामांच्या माध्यमातून कार्यरत राहण्याची गरज असून सीताबाई थिटे कॉलेज ऑफ फार्मसी या शिबिराच्या माध्यमातून सामाजिक, वैद्यकीय, शैक्षणिक व लोकप्रबोधनपर काम करीत असल्याचे प्रतिपादन संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील यांनी व्यक्त केले.**

सिताबाई थिटे कॉलेज ऑफ फार्मसी राष्ट्रीय सेवा योजना हिवाळी विशेष शिबिराचे निघोज येथे उद्घाटन झाले, यावेळी सरपंच चित्राताई वराळ पाटील व उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे , बबन, खवडा, गिर्दाब, कोती फेम अमोल दादा थोरात, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ डी जे बोहती, मंळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त भास्करराव वराळ, पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे, उपाध्यक्ष भास्करराव कवाद, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका प्रवक्ते अस्लमभाई इनामदार, गायकवाड मॅडम, कार्यक्रम अधिकारी मोनाली परभणे गणेश वराळ आदी मान्यवर उपस्थित होते.

श्री.वराळ पाटील यावेळी म्हणाले सीताबाई थिटे कॉलेज ऑफ फार्मसी हे शिरुर शहरातील नामांकित कॉलेज असून सेवाभाव महत्वाचा असल्याचे त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिले आहे. या परिसरत श्रमसंस्कार शिबीर घेऊन त्यांनी या भागातील विकासकामांचे अवलोकन करण्याची गरज असून शिक्षणानंतर आपल्या गावात आपण काय करु शकतो हे त्यांना प्रत्यक्ष विकासकामे पाहूनच करता येईल असे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे.

या कार्यक्रमा प्रसंगी उपसरपंच माऊली वरखडे यांनी सांगितले की, निघोज परिसरात संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनखाली मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली आहेत याचीही माहिती विद्यार्थ्यांना होणार आहे. विद्यार्थी ग्रामीण भागातील आहे मात्र ते शहरात शिक्षण घेत असल्याने ग्रामीण भागात विकासाचे काम कशाप्रकारे करता येते याची माहिती त्यांना होणार आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जे. बाहेती यांनी आपल्या मनोगतामध्ये महाविद्यालयीन जीवनामध्ये असणारे शिबिराचे महत्व सांगितले व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण असलेले सिने अभिनेते अमोल दादा थोरात यांनीही त्यांच्या कलेतून मुलांना प्रबोधन केले.

या शिबिरामध्ये जवळपास ८६ नागरिकांनी मोफत नेत्र तपासणी व मोफत औषध वाटप याचा लाभ घेतला. सायंकाळी संमोहन शास्त्राचा कार्यक्रम पार पडला. या मध्ये संपदा कांदळकर यांनी मुलांना प्रात्यक्षिक करून मुलांच्या बौद्धीक क्षमता वाढवण्यासाठी संमोहन शास्त्र कसे उपयोगी पडते हे सांगितले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आयोजन सौ. मोनाली परभणे यांनी केले.

# लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी तरुणांनी मतदान करणे आवश्यक

## नायब तहसीलदार केतकी कुलकर्णी यांचे मत



**पारनेर : प्रतिनिधी**

**लोकशाही व्यवस्था भारतामध्ये यशस्वी होण्यासाठी भारतीय नागरिकांचा सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. त्याचाच एक भाग म्हणून तरुणांनी ही लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी मतदानाच्या प्रक्रियेमध्ये सक्रियपणे सहभाग नोंदवणे महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन नायब तहसीलदार केतकी कुलकर्णी यांनी केले.**

पारनेर येथील न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाचा पारनेर तालुक्यातील पुणेवाडी येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर आयोजित करण्यात आले होते त्या शिबिराच्या समारोप प्रसंगी राष्ट्रीय मतदान दिनाच्या निमित्ताने महाविद्यालय व पारनेर तहसील कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला. तहसील कार्यालय पारनेर व महाविद्यालयाचा राज्यशास्त्र विभाग, एनसीसी, एनएसएस,मतदार जागृती कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी श्रीमती कुलकर्णी बोलत होत्या.

सदर कार्यक्रमाच्या निमित्ताने गावामध्ये विद्यार्थ्यांनी मतदार जनजागृतीसाठी रॅलीचे आयोजन केले. राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्राध्यापक नितीन निपुंगे यांनी विद्यार्थ्यांना व पाहुण्यांना मतदानाची शपथ दिली.कार्यक्रम प्रसंगी संस्थेचे विश्वस्त मुकेश मुळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर, उपप्राचार्य डॉ. अनिल आठरे,समन्वयक डॉ. तुकाराम थोपटे, डॉ. नंदकुमार उदार, प्रा. संदीप ठोंबरे यांच्यासह इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सक्रिय सहभाग नोंदवला.

# बाजरी, मुग व कांदा उत्पादकांनाही विमा रक्कम द्या : विश्वनाथ कोरडे यांची मागणी

**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील शेतकऱ्यांना २०२३-२०२४ च्या खरीप हंगामामधील सोयाबीन व मका या पिकांना ज्या प्रमाणे प्रधानमंत्री पिक विमा योजनेची अग्रीम रक्कम देण्यात आली त्याच प्रमाणे बाजरी मुग व कांदा या अडचणीत सापडलेल्या पिक उत्पादक शेतकऱ्यांनाही पिक विमा योजनेचा लाभ मिळवून देण्याची मागणी भाजपाच्या प्रदेश कार्यकारणीचे विद्यमान सदस्य विश्वनाथ कोरडे यांनी पत्राद्वारे जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.**



पारनेर तालुक्यातील बाजरी, मुग व कांदा या पिकांचे काही ठिकाणी पाऊस न झाल्यामुळे तर काही ठिकाणी अवेळी झालेल्या गारपीटीमुळे प्रचंड प्रमाणात नुकसान झालेले असल्याचा उल्लेख करत सबंधित शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पिक विमा योजनेची अग्रिम रक्कम पारनेर तालुक्यातील सलग्न असलेल्या पिक विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांसमवेत चर्चा करून देण्यात यावी अशी मागणीही त्यांनी या वेळी जिल्हाधिकारी सिद्धराम सालीमठ यांसह जिल्हा कृषी अधिकारी व तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केली आहे.

श्री.कोरडे यांच्या प्रयत्नांमुळे नुकतीच पारनेर तालुक्यातील सोयाबीन व मका पिक उत्पादक शेतकऱ्यांच्या १६.०५ कोटी रुपये पीकविम्याची अग्रिम रक्कम बँक खात्यांवर प्रत्यक्ष जमा झालेली असल्याने सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांत समाधान पसरले असून त्यांनी पुन्हा एकदा केलेल्या बाजरी, मुग व कांदा पिकाच्या अग्रिम रकमेच्या या मागणीमुळे तालुक्यातील नैसर्गिक अनियमिततेमुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

# प्रा.डॉ. विजयकुमार राऊत यांना भाषा विषयातील पेटंट

## पुस्तकांचे भाषांतर करणे सहज शक्य होणार

**पारनेर : प्रतिनिधी**



**पारनेर येथील न्यू आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज मधील हिंदी विभागप्रमुख व संशोधन मार्गदर्शक डॉ. विजयकुमार राऊत यांना भाषांतरासाठीचे मेथड ट्रान्सलेशन इंग्लिश हिंदी टू मराठी मराठी टू इंग्लिश हिंदी या विषयावरील व भाषा शिक्षण प्रणालीसाठी इंटेलिजंट मेथड ॲण्ड प्रोसेस ऑफ लॅंग्वेज हिंदी मराठी लर्निंग सिस्टीम या विषयासाठी भारत सरकारच्या पेटंट प्रबंधक कार्यालयाकडून दोन पेटंट प्राप्त झाले आहेत.**

नवीन शैक्षणिक धोरणात भारतीय भाषांमधून व मातृभाषेतून शिक्षण दिले जाणार असल्याने हिंदी व इंग्रजी पुस्तकांचे भाषांतर करणे व भाषा विषयांचे शिक्षण घेणे त्यांच्या दोन्ही पेटंटमुळे सहज शक्य होऊन अतिशय कमी श्रमात व कमी वेळेत इंग्रजी व हिंदीतून मराठीमध्ये व मराठीतून इंग्रजी व हिंदी मध्ये भाषांतर करणे शक्य होणार आहे.

डॉ.विजयकुमार राऊत यांनी यापूर्वी सयाजीराव गायकवाड यांच्या शिक्षण विषयक विचार व पत्रसंग्रहांच्या तसेच नरेंद्र दाभोळकरांच्या भानामती या पुस्तकाचे हिंदीमध्ये भाषांतर केले आहे त्यांनी मराठी व हिंदी भाषेत विविध भाषांवरील चार ग्रंथांचे लेखन केले असून त्यांचे इतर संशोधन लेख सुद्धा प्रकाशित झाले आहेत.

त्यांच्या या यशाबद्दल अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, सचिव जी.डी.खानदेशे, सहसचिव ॲड.विश्वासराव आठरे पाटील, खजिनदार डॉ. विवेक भापकर, संस्थेचे सर्व विश्वस्त व सदस्य त्याचप्रमाणे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर, माजी प्राचार्य डॉ.रंगनाथ आहेर, उपप्राचार्य डॉ.अनिल आठरे, माजी उपप्राचार्य डॉ. दिलीप ढुबे यांनी अभिनंदन केले आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com